# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः02.01.2025** **वारःगुरुवार**

---

1. वर्षाच्या प्रारंभी देशातल्या शेतकऱ्यांच्या हिताच्या दृष्टीने काल केंद्रीय मंत्रिमंडळाचे अनेक महत्वपूर्ण निर्णय
2. हरितगृह वायू उत्सर्जन कमी करण्याच्या भारताच्या प्रयत्नांना यश
3. भोपाळ गॅस दुर्घटनेच्या चाळीस वर्षांनंतर, बंद कारखान्यातून सुमारे 377 टन घातक कचरा विल्हेवाटीसाठी हलवण्यास सुरुवात आणि
4. देशात 123 वर्षांनंतर 2024 हे ठरल सर्वात उष्णतेच वर्ष

**<u>केंद्रीय मंत्रिमंडळ निर्णय</u>**

केंद्रीय मंत्रिमंडळाने काल वर्षाच्या प्रारंभी देशातल्या शेतकऱ्यांच्या हिताच्या दृष्टीने अनेक महत्वपूर्ण निर्णय घेतले. डीएपी, अर्थात डायअमोनियम फॉस्फेट खतांवर प्रतिटन साडेतीन हजार रुपये विशेष अनुदान पुढं चालू ठेवण्याचा तसच पंतप्रधान पीक विमा योजना आणि हवामानाधारित पीकविमा योजनेला 2025-26 या आर्थिक वर्षापर्यंत मुदतवाढ देण्याचा निर्णय कालच्या केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला. केंद्रीय माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी काल केंद्रीय मंत्रिमंडळ बैठकीनंतर बातमीदारांना याबद्दल माहिती दिली. ते म्हणाले की खत वितरण विभागाने मांडलेल्या प्रस्तावानुसार शेतकऱ्यांना परवडणाऱ्या किंमतीत खते मिळावी यासाठी या विशेष पॅकेजची घोषणा करण्यात येत असून, हा निर्णय पुढच्या आदेशांपर्यंत लागू राहील. शेतकऱ्यांना आता डी ए पी ची 50 किलोची पिशवी एक हजार 350 रुपयांना उपलब्ध होईल, यासाठी 3 हजार 850 कोटी रुपयांची अतिरिक्त तरतूद करण्यात येईल आणि हा भार केंद्रसरकार उचलेल.

पंतप्रधान पीक विमा योजना आणि पुनर्रचित हवामान आधारित पीक विमा योजना 2025-26 पर्यंत सुरु ठेवण्यासाठीही मंत्रिमंडळाने मंजुरी दिली असून योजनेच्या 2025-26 या काळासाठी एकंदर 69 हजार रुपये 515 कोटी वाढीव खर्चाची तरतूद करण्यात आली आहे. या निर्णयामुळे 2025-26 पर्यंत देशभरातील शेतकऱ्यांना आकस्मिक नैसर्गिक आपत्तींमुळे उद्भवणाऱ्या जोखमीपासून पिकाचे संरक्षण करायला मदत होईल.

या योजनेचे सुमारे 88 टक्के लाभार्थी अल्पभूधारक आणि लहान शेतकरी आहेत. तसंच 57 टक्के लाभार्थी इतर मागासवर्गीय, अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातीतले आहेत. गेल्या 8 वर्षात लाभार्थी शेतकऱ्यांचे एक लाख सत्तर हजार कोटी रुपयांचे दावे मंजूर झाल्याची माहिती अश्विनी वैष्णव यांनी यावेळी दिली.

शेतकऱ्यांच्या समृद्धी आणि कल्याणासाठी केंद्रसरकार वचनबद्ध असल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हंटल आहे. केंद्रीय मंत्रिमंडळानं घेतलेल्या निर्णयांसंदर्भात त्यांनी आपल मत व्यक्त करताना सांगितल की 2025 च्या पहिल्या दिवशी झालेली ही केंद्रीय मंत्रिमंडळाची बैठक शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी समर्पित होती आणि वर्षभर केंद्रसरकार शेतकऱ्यांच उत्पन्न वाढवण्यासाठी आणि त्यांच्या समृद्धीसाठी प्रयत्नशील राहणार आहे देशासाठी अन्न पिकवणाऱ्या

शेतकऱ्यांचा देशवासियांना अभिमान आहे अस ही मोदी म्हणाले. 2024-25 या वर्षात भारतातील कृषि आणि त्यावर आधारित उद्योग क्षेत्राची वाढ तींन ते चार टक्क्यांची असेल अशी माहिती केंद्रीय कृषिमंत्री शिवराजसिंह चौहान यांनी मंत्रिमंडळ बैठकी नंतर बातमीदारांना दिली. केंद्रसरकारनं तांदळाच्या निर्यातीसाठी किमान भावाची मर्यादा काढून टाकली असून बासमती खेरीज इतर तांदळाच्या व्यापारासंदर्भात काल इंडोनेशियाबरोबर करार झाल्याचंही त्यांनी सांगितलं.

**जीसटी**

जीएसटी अर्थात वस्तू आणि सेवाकर संकलन दरात 2023 च्या डिसेंबर महिन्याच्या तुलनेत 2024 च्या डिसेंबर महिन्यात 7 पूर्णांक 3 दशांश टक्क्यांची वाढ झाली असून ते 1 लाख 76 हजार कोटी रुपयांवर पोहोचलं आहे. डिसेंबर 2023 मध्ये जीएसटी संकलन 1 लाख 64 हजार कोटी इतकं होतं.

**गॅस सिलेंडर**

पेट्रोलियम कंपन्यांनी स्वयंपाकाच्या व्यावसायिक गॅस सिलेंडर च्या किमतीत साडे चौदा रुपयांची कपात केली आहे. त्यामुळे आता नवीदिल्लीत 19 किलो वजनाचा व्यावसायिक गॅस सिलेंडर 804 रुपयांना, मुंबईत 1 हजार 756 रुपयांना, कोलकाता इथ 1911 रुपयांना ते चेन्नईत 1 हजार 966 रुपयांना मिळेल. घरगुती स्वयंपाकाच्या गॅस सिलेंडर च्या किमतीत कोणताही बदल करण्यात आलेला नाही.

**नौदल**

भारतीय नौदल या महिन्याच्या 15 तारखेला स्वदेशी बनावटीच्या तीन युद्धनौका निलगिरी, सुरत आणि वाघशीर मुंबईतील नौदल गोदीत कार्यान्वित करणार आहे. या तीन लढाऊ नौका कार्यान्वित झाल्यामुळं भारतीय नौदलाच्या लढाऊ तयारीला मोठं बळ मिळणार आहे, तसंच, संरक्षण स्वावलंबन आणि स्वदेशी जहाजबांधणीमध्ये देशाच्या अतुलनीय प्रगतीचा पुरावा देखील सिद्ध होईल.

**उत्सर्जन**

हरितगृह वायू उत्सर्जन कमी करण्याच्या भारताच्या प्रयत्नांना यश आलं आहे. 2020 मध्ये देशाच्या उत्सर्जनात त्याआधीच्या वर्षाच्या तुलनेत 7.93 टक्क्यांनी घट झाली आहे. संयुक्त राष्ट्र संघटनेच्या  हवामान बदल कार्यालयाला सादर केलेल्या 2005 ते 2020 पर्यंतच्या आकडेवारीत भारताच्या GDP च्या तुलनेत उत्सर्जनाच्या तीव्रतेत 36 टक्क्यांनी घट झाल्याचं दिसून आलं. भारतानं 2030 पर्यंत जीडीपी उत्सर्जन तीव्रता 45 टक्क्यांनी कमी करण्याचं आणि जीवाश्मेतर इंधनांपासून 50 टक्के विद्युत उर्जा क्षमता साध्य करण्याचं उद्दिष्ट ठेवलं असून आपल्या हवामान उद्दिष्टांच्या मार्गावर आहे. उर्जा उत्पादन, शेती आणि उद्योग यांचा उत्सर्जनामध्ये महत्त्वपूर्ण वाटा असल्यानं, भारतानं पर्यावरणीय समस्यांचं निराकरण करताना विकासाचा मार्ग कायम ठेवण्याचा प्रयत्न करत उत्सर्जनातून आर्थिक वाढ दुप्पट करणं सुरू ठेवलं आहे.

**भोपाळ-कचरा**

भोपाळ गॅस दुर्घटनेच्या चाळीस वर्षांनंतर, बंद असलेल्या युनियन कार्बाइड कारखान्यातून सुमारे 377 टन घातक कचरा विल्हेवाटीसाठी हलवण्यास काल सुरुवात झाली. हा विषारी कचरा 12 सीलबंद कंटेनर ट्रकमधून भोपाळपासून अडीचशे किलोमीटर अंतरावर असलेल्या धार जिल्ह्यातील पिथमपूर औद्योगिक परिसरात हलवला जात आहे. भोपाळ गॅस दुर्घटनेतील मदत आणि पुनर्वसन विभागाचे संचालक स्वतंत्र कुमार सिंग यांनी सांगितलं की, धोकादायक कचरा वाहतूक करणाऱ्या वाहनांसाठी विशेष रस्ता मोकळा करण्यात आला आहे. प्रारंभी, पिथमपूरमधील कचरा विल्हेवाट संयंत्रामध्ये

काही कचरा जाळला जाईल आणि काही हानिकारक घटक शिल्लक आहेत की नाही हे शोधण्यासाठी त्याची राख तपासली जाईल, असं सिंह म्हणाले. संयंत्रामधून निघणारा धूर विशेष चार थरांच्या गाळण्यामधून जाईल जेणेकरून आजूबाजूची हवा प्रदूषित होणार नाही. 2 आणि 3 डिसेंबर 1984 च्या मध्यरात्री युनियन कार्बाइड या कीटकनाशक निर्मिती कारखान्यातून अत्यंत विषारी मिथाइल आयसोसायनेट वायूची गळती झाली, त्यामुळे हजारो लोक मरण पावले आणि हजारो लोकांना गंभीर आणि दीर्घकाळ टिकणाऱ्या आरोग्य समस्या झाल्या. जगातील सर्वात वाईट औद्योगिक आपत्तींपैकी ही एक घटना मानली जाते.

**हल्ला**

अमेरिकेत काल नववर्षाच्या पहिल्याच दिवशी न्यू ऑरलियेंस इथल्या फ्रेंच क्वार्टर मध्ये एक व्यक्तीने गर्दीत ट्रक घुसवून केलेल्या हल्ल्यात 15 जन ठार तर 35 नागरिक जखमी झाले आहेत. ट्रक घुसवणारा माथेफिरू तरुण 42 वर्षाचा असून शमसुद्दींन बहार जब्बार अस त्याच नाव आहे आणि तो पोलिसांच्या गोळीबारात मारला गेला. त्याच्या कडून एक रायफल जप्त करण्यात आली असून ट्रक वर लावलेले काळे झेंडे कोणत्या अतिरेकी संघटनेशी संबंधित आहेत का याचा पोलिस तपास करत आहेत. अमेरिकेचे अध्यक्ष ज्यो बायडन यांनी या घटनेचा निषेध केला असून, त्यातील मृतांच्या कुटुंबीयांप्रति सहवेदना व्यक्त केली आहे तसच जखमींना सरकारतर्फे सर्व मदत द्यायच आश्वासन दिल आहे.

**तिकीटं**

नवी दिल्लीतील प्रजासत्ताक दिन संचलन आणि बीटिंग रिट्रीटसाठी तिकिटांची विक्री आजपासून सुरू होत आहे. सर्वसामान्य लोक aamantran.mod.gov.in आणि Aamantran मोबाइल ॲपवरून थेट तिकिटं खरेदी करू शकतात. संचलनासाठी तिकिटांची किंमत 20 ते 100 रुपयांदरम्यान आहे, तर बीटिंग रिट्रीट रिहर्सलसाठी 20 रुपये आहे.

**उष्ण वर्ष**

देशात 1901 सालानंतर 123 वर्षांनंतर 2024 हे वर्ष सर्वात उष्णतेच वर्ष ठरल असल्याची माहिती काल भारतीय हवामान विभागाच्या वतीने देण्यात आली. हवामान विभागाचे महासंचालक मृत्युंजय महापात्रा यांनी ही माहिती दिली. तसच जानेवारी महिन्यात देशातील उत्तर पश्चिम आणि मध्य पश्चिम भाग वगळता इतर सर्व ठिकाणी किमान आणि कमाल तापमान सरासरीपेक्षा अधिक राहण्याची शक्यता आहे. देशाचा उत्तर पश्चिम आणि मध्य पश्चिम राज्यात थंडीची लाट कायम राहण्याचा हवामान विभागाचा अंदाज आहे.

# याबरोबर हे राष्ट्रीय बातमीपत्र संपल, नमस्कार